दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● सोमवार ६ मे २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २६३ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# जिल्ह्यांतील गाव वस्ती अनं तांड्यावर बजरंगाचे वारे ; आता परिवर्तन होणार घुमू लागले नारे

**(अंबाजोगाई प्रतिनिधी)**

बीड जिह्याला एक इतिहास आहे बीड जिल्हयातील निवडणुक लोकसभा असो वा विधानसभा जनता ज्यावेळेस हातात घेते त्यावेळेस परिवर्तन निश्चित होते हे नक्की. तसे संबंध महाराष्ट्राने वारंवार पाहिले आहे. त्याच प्रकारे यावेळेसची बीड जिल्ह्यातील लोकसभा निवडणुक जनतेने हातात घेतली आहे. त्याचे एकमेव कारण म्हणजे बीड जिल्हयाचा भ्रष्टाचारामुळे झालेला अविकास. याठिकाणचे अनेक महत्त्वाचे मुद्दे जनतेला उत्कर्षाने जानवत आहेत ते म्हणजे रेल्वेचा प्रश्न भ्रष्टाचाराचा प्रश्न, बेकारीचा प्रश्न, उसतोड मजुरांचा प्रश्न, पाण्याचा प्रश्न असे अनेक प्रश्न मोठया प्रमाणात तोंड वरती काढुन बसले आहेत. मात्र त्याला स्थानिकच्या प्रतिनिधी तथा नेत्यांनी वारंवार दुर्लक्षित केले. प्रत्येक निवडणुका आल्या त्यामध्ये लोकसभा, विधानसभा ,जिल्हा परिषद , पंचायत समिती तसेच गावगाड्याची ग्रामपंचायत कि हेच मुद्दे वारंवार पुढे करायचे आणि मतदान मागायचे. परंतु या गोष्टीला बीड जिल्हयातील जनतेने चांगलेच ओळखून परिवर्तन करण्याचे ठरवले असल्याचे जागोजागी निर्देशनास येते आहे. स्वातंत्र्यापासून ते आजपर्यंत जिल्ह्याचा विकास व्हावा म्हणून अनेक नेत्यांना खासदार म्हणून बीड जिल्हयातील जनतेने लोकसभेत पाठवले मात्र खासदार म्हणून कोणत्याही स्वरूपाचा जिल्हयाचा विकास झाला नाही. याला अपवाद वगळता बीड जिल्ह्यातील या सर्व बांबीची जान असणारे स्व.गोपीनाथ मुंडे साहेब हे दलित, कष्टकरी, शेतकरी, मजुर, यासह आठरापगड जातीचे नेतृत्व याच नेतृत्वार बीड



जिल्ह्यातील जनतेचा पूर्णपणे विश्वास होता यामुळे जनतेनेच त्यांना लोकनेता पदवी बहाल केली होती. परंतु स्व. गोपीनाथ मुंडे यांचे आपघाती निधन झाल्यामुळे बीड जिल्ह्यातील जनतेला या नेतृत्वाला मुकावे लागले. यानंतर परत अविकासाची मालिका सुरु झाली. जिल्ह्यातील जनतेला आज घडिला महायुती पेक्षा महाविकास आयाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या नावाची चर्चा जिल्ह्यांतील शहर, गाव ,वस्ती अनं तांड्यावर होऊ लागली आता बीड जिल्हयाचा विकास होणार परिवर्तन होणार जिल्ह्यातील अनेक प्रश्नांना पूर्णविराम मिळणार अश्या परिवर्तनाचे नारे जिथे-तिथे घुमू लागले आहेत.

# असा एक रस्ता ; काम न करता बोगस बील उचलले दोनदा

**वादळवार्ता/केज**

भ्रष्टाचार कसा आणि कोणत्या स्वरूपाची शक्कल लावून केला जातो हे पहायचे असेल तर या गावाला भेट जरूर द्यावी गावगाड्याची परिस्थिती पहायला मिळेल. मुख्य म्हणजे दळवळणाची व्यवस्था जर व्यवस्थित नसेल तर गावगाडयाचा विकास होणे अशक्य आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे केज तालुक्यातील मौजे बोरगांव (बु.) येथील पानंद रस्त्याचे काम न करताच लाखो रुपयाची बोगस बिल उचलण्यात आल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते श्रीमंत गव्हाणे यांनी केज पंचायत समिती तथा तहसील कार्यालय केज या ठिकाणी केली आहे या तक्रारीत त्यांनी असे म्हटले आहे की मौजे बोरगांव (बु.) ता. केज येथील बोरगांव (बु.) ते आधडी शिव पांधन रस्त्याचे काम ७ वर्षापूर्वीच पुर्ण झालेले असतांना सदरील रस्त्यावर नंतर गांवकऱ्यांनी लोकसहभाग तयार करुन सदरील रस्त्यावरील पडलेले खड्डे व रस्ता दुरुस्ती सन २०२३ ला करण्यात आलेले असतांना बोगरंव (बु.) ग्रामपंचायतने सदरील केलेला रस्ताच बोरगांव (बु.) ते बोरगांव आथर्डी शिव पांधन रस्ता भाग- १ वर्क कोड (१८१८००५०१६/ आरसी/१२३४७५२७९४ ) व बोरगांव (बु.) ते बोरगांव आथर्डी शिव पाधंन रस्ता भाग- २ वर्क कोड (१८१८००५०१६/आरसी/१२३४७५२७९८ ) अशा प्रकारे काम मंजुर करुन सदरील रस्त्यावर कसल्याही प्रकारचे काम न करता व चालु असलेली आचार संहितेचा गैरफायदा घेऊन आचार संहितेतच रेकॉर्डतील काम चालु करुन सदरील रस्त्याचे लाखो रुपयांचे बोगस बील उचलण्यात आलेले असून अजूनही सदरील रस्त्यावर बोगस बील उचलण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी मे. साहेबांनी सदरील रस्त्याचे काम तात्काळ बंद करुन सदरील रस्त्याची स्थळ पाहणी पंचनामा करुन सदरील दोषी विरुध्द तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत. सध्या आचारसंहिता चालु असल्यामुळे कोणत्याही प्रकारचे आंदोलन करता येत नाही याचाच गैरफायदा ग्रामपंचायत बोरगांव (बु.) घेत असून आपणास हे पत्र प्राप्त होताच सदरील काम तात्काळ थांबविण्यात यावे व शासकिय निधीचा होणारा अपहार तात्काळ थांबवावा अन्यथा आचार संहिता संपल्यानंतर अमरण उपोषण करण्यात येईल. याची गांभीर्यपूर्वक आपण दखल घ्यावी असे निवेदनात म्हटले आहे.




# कोठाळा येथे एरंडा गंजीला आग शेतक-यांचे लाखोंचे नुकसान

वादळवार्ता/नायगांव



नायगांव तालुक्यातील कोठाळा येथील शेतकरी मारोतराव किशनराव कोठाळकर यांच्या एरंडा गंजीला आग लागून शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान झाले आहे आज दिनांक ३ मे रोजी दुपारी दोन च्या सुमारास अचानक लागलेल्या आगीत अंदाजे १५ वीस क्विंटल दोन लाख रूपयांचे एरंडा जळून खाक झाले आहे त्यामुळे कर्जबाजारी असलेल्या मारोतराव किशनराव कोठाळकर यांच्यावर मोठे संकट कोसळले आहे त्यांनी शासनाने झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून आर्थिक मदत करवी अशी मागणी केली आहे

# आज ह.भ.प.रोहिदास महाराज शास्त्री यांचे काल्याचे किर्तन

**वादळवार्ता/आष्टी**

आष्टी तालुक्यातील हातोला (खलाटवाडी) येथील श्री क्षेत्र राजे धर्माजी गड येथे दि.२९ एप्रिल ते ६ मे २०२४ दरम्यान सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याची सांगता आज दि.६ मे २०२४ सोमवार रोजी राजे धर्माजी गडाचे मठाधिपती ह.भ.प.रोहिदास महाराज शास्त्री (भागवत भास्कर) यांचे काल्याचे किर्तनाने होत असून या किर्तनाचा व महाप्रसादाचा पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने येऊन लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थ हातोला व खलाटवाडी यांनी केले आहे. यावेळी भाजपच्या राष्ट्रीय नेत्या पंकजाताई मुंडे,पालकमंत्री धनंजय मुंडे,खा. प्रितमताई मुंडे,भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, आ.सुरेश धस,आ.बाळासाहेब आजबे,मा. आ.भिमराव धोंडे,साहेबराव दरेकर,विजय गोल्हार आदिसह आजी माजी जि.प.सदस्य, पं.स.सदस्य आदिसह परिसरातील आजी-माजी सरपंच-उपसरपंच,ग्रा. पं.सदस्य, चेअरमन तसेच भाविक-भक्तांची उपस्थिती लाभणार आहे.



# योगिता बाळ रुग्णालयाचे डॉ. दिनकर राऊत यांनी बाळाला दिले होते जीवनदान ; पाल्यांनी केला बाळाचा प्रथम वाढदिवस दवाखान्यात साजरा

वादळवार्ता/केज देव तारी त्याला कोण मारी असे म्हणतात. हे रक्षणाचे काम माणसांकडूनच करून घेतले जाते. केजमधील योगिता बाळ रुग्णालयाचे डॉ. दिनकर राऊत आणि त्यांच्या पूर्ण टीमने वर्षभरापूर्वी सहाव्या महिन्यात जन्म झालेल्या बालकाला अथक परिश्रमाने जीवदान मिळवून दिले होये. त्या घटनेला वर्ष झाले आणि त्या परिश्रमांची आठवण ठेवत त्या बालकाच्या पालकांनी आपल्या बाळाचा पहिला वाढदिवस चक्क योगिता रुग्णालयात साजरा केला. धारूर तालुक्यातील जंहागीर मोहा येथील सर्वसामान्य जीवन जगणारे रिंकल मुंजाराम निरडे कुटुंबीयांना मातृत्व आणि पितृत्वाची ओढ लागलेली होती. मात्र निसर्ग नियमाप्रमाणे जे घडायला पाहिजे ते न घडता काहीतरी अनाकलनीय होते की काय? अशी शंका निरडे कुटुंबियांना सताऊ लागेली होती. मातेला अगदी सहाव्या महिन्यातच गुंतागुंत निर्माण झाली. तीन महिन्या अगोदरच बाळ जन्माला घालावे लागले. तीन महिन्या अगोदर जन्माला आलेले बाळ अगदी तळ हातावर बसेल एवढ्याच वजनाचे दिसत होते. जेव्हा हा बाळंत पणाचा गुंता सुरू झाला तेव्हा निरडे कुटुंबीयांनी बीड येथील एका डॉक्टरकडे धाव घेतली. मात्र बाळंतपण थोडे गुंतागुंतीचे आहे असे सांगत त्या डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी त्यांना संभाजीनगर येथे जाण्यास सांगितले. केज येथेही एक निष्णात डॉक्टर दांपत्य असून अनेक गुंतागुंतीचे बाळ आणि बाळांतनीचे त्यांनी प्रश्न सोडवलेले आहेत अशी माहिती मिळाल्यावरून केज शहरातील योगिता बाल रुग्णालय चालवत असलेले डॉक्टर दिनकर राऊत व डॉक्टर हेमा राऊत यांच्याकडे ते पूर्ण विश्वासाने आले. आणि त्या ठिकाणी अगदी सहा महिन्यांमध्ये माता प्रसूत झाली आणि अवघ्या साडेसहा ग्रॅमचे बाळ जन्माला आले. एवढ्या कमी वयाचे आणि कमी वजनाचे बाळ जगवणे ही तारेवरची कसरत होती. मात्र डॉक्टर राऊत दाम्पत्याने ते आव्हान स्वीकारून सलग तीन महिने त्या बाळावर उपचार केले आणि २५ जुलै २०२३ रोजी त्यांना डिस्चार्ज दिला. कालांतराने बाळ मोठे होऊ लागले आणि निसर्ग नियमाप्रमाणे ते एक वर्षाचेही झाले एक वर्षाचे बाळ झाल्यानंतर त्याचा वाढदिवस कुठे करायचा ? हा प्रश्न जेव्हा समोर आला तेव्हा साहजिकच निरडे दांपत्याने ज्या डॉक्टर दांपत्यामुळे बाळ हे जग पाहू शकले अशा योगिता बाल रुग्णालयामध्ये पहिला वाढदिवस साजरा करण्याचे ठरवले. आणि दिनांक ३ मे २०२४ रोजी शिवतेज नाव ठेवलेल्या बाळाचा पहिला वाढदिवस योगिता बाल रुग्णालयामध्ये मोठ्या आनंदाने साजरा केला. यावेळी निरडे कुटुंबियांनी मोठ्या मनाने डॉक्टर दिनकर राऊत आणि डॉक्टर हेमा राऊत यांचाही हृदय सत्कार केला. आणि आमच्या बाळाला केवळ आणि केवळ तुमच्यामुळेच जीवदान मिळालेले आहे असे म्हणून ऋणही व्यक्त केले.



संपादकीय

# संगीतशास्त्रात निपुण असे पं.तानसेन!

(पं.तानसेन पुण्यस्मृती विशेष.) कलाकारांना धर्म नसतो असं म्हणतात. त्यांची कला हाच त्यांचा धर्म असतो, पण काही कलाकारांनी इतिहासात आपली अशी काही छाप सोडली आहे की, त्यांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दलही आपल्या मनात कुतूहल निर्माण होतं आणि आपण त्याची माहिती शोधून काढतो. बापू-श्रीकृष्णदास निरंकारी यांचा सदर संकलित लेख अवश्यच आपल्या ज्ञानात भर घालेल... संपादक.

अकबराच्या दरबारातील रत्न म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तानसेन बद्दल अशीच एक चकित करणारी माहिती इतिहास अभ्यासकांनी उपलब्ध करून ठेवलेली आहे. नावावरून आणि आजवर ऐकलेल्या कथांवरून तानसेन ही व्यक्ती मुस्लिम धर्मीय असावी, असा बहुतांश लोकांचा अंदाज आहे, पण आपल्या गायन कलेने आणि उर्दूच्या अस्खलित उच्चाराने अकबर राजा आणि दरबाराला प्रभावित करणारा हा गायक हिंदू धर्मात जन्माला आलेला होता, अशी माहिती एका इतिहास अभ्यासकाने लिहून ठेवलेली आहे. तानसेन हे एक श्रेष्ठ भारतीय गायक होत. संगीतक्षेत्रात अलौकिक अशा गणल्या गेलेल्या या कलावंताबद्दल जितके चमत्कार आणि दंतकथा प्रचलित आहेत, त्या मानाने त्याचे अधिकृत चरित्र असे कोठे नोंदले गेलेले नाही. त्याचे जन्मवर्ष १५०६, १५२६, किंवा १५३१–३२ असेही दर्शविले जाते. तानसेनचे मूळ नाव रामतनू किंवा तन्नामित्र असे होते. ग्वाल्हेरजवळ बेहट या गावी त्याचा जन्म झाला. त्याचे वडील मकरंद पांडे हे गौड ब्राम्हण, संस्कृत पंडित व उत्तम गायक होते. त्यांच्यामुळे त्याला लहान वयातच गाण्याची गोडी लागली. तानसेनची ग्रहणशक्ती पाहून वृंदावनचे संत स्वामी हरिदास यांनी तानसेनला गाणे शिकवले. आरंभी ग्वाल्हेर येथे दरबारात राहिल्यावर आणि गायक म्हणून प्रतिष्ठा प्राप्त केल्यावर तो रीवा नरेश, रामचंद्र बाघेला यांच्या दरबारांत गायक म्हणून राहिला. तेथून सन १५६२च्या सुमारास तानसेन अकबर बादशाहाच्या दरबारात आले. अकबरच्या दरबारात येण्यापूर्वीच सर्वोत्कृष्ट गायक म्हणून त्यांची ख्याती पसरलेली होती. अकबराने त्यांना विशेष सन्मान देऊन संगीतसम्राट तानसेन म्हणून गौरविले आणि आपल्या दरबारी नवरत्नांमध्ये त्यास स्थान दिले. पुढे तानसेन हे संगीतक्षेत्रातील एक अद्‌भूत चमत्कार म्हणून ख्याती पावले. तानसेन हे धृपद गायक होते. शिवाय त्यांनी स्वतः रचलेली अनेक धृपदेही प्रसिद्ध आहेत. रागकल्पद्रुम या ग्रंथात तानसेनने रचलेली अनेक धृपदे आढळतात. त्यांनी व्रज भाषेत आपली पद्यरचना केली.

तानसेनचा जन्म इ.स.१५३२मध्ये मध्यप्रदेश मधील बेहट, ग्वाल्हेर येथे एका ब्राम्हण घरात झाला होता. त्याचं खरं नाव रामतनू पांडे असं होतं. त्याच्या वडिलांचं नाव मुकुंदराम पांडे असं होतं. मुकुंदराम पांडे हे एक कवी आणि संगीतकार होते. काही काळ त्यांनी वाराणसीच्या मंदिरात प्रवचनकार म्हणून काम केलं होतं. तानसेनने गाण्याचं शिक्षण आपल्या वडिलांकडून घेतलं होतं. रामतनू हा मुकुंदराम पांडे यांचा एकुलता एक सुपुत्र होता.

# उत्कृष्ट तथा कर्तव्यदक्ष बालरोग तज्ञ डॉ. दिनकर राऊत

केज या अतिशय छोटया तालुक्यात बालरोग चिकित्सा विभागात अतिशय अफलातून उपचार करणारे एक अद्यायावत रुग्णालय आहे. वकीलवाडी परिसरात असणाऱ्या या योगिता बाल रुग्णालय या अद्यायावत रुग्णालयाला भेट देण्याचा योग मला काही दिवसांपुर्वी आला होता. या रुग्णालयात बाल उपचारासाठी आवश्यक असलेल्या सुविधा आणि त्या सुविधा पुरवणा-या डॉ. दिनकर राऊत यांचे काम पासुन मी अचंबित झालो होतो. एवढे मोठे धाडस करणा-या डॉ. दिनकर राऊत यांच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्याचा माझा प्रयत्न चालू होता. त्या अनुषंगाने चर्चा करीत असतांना बाल चिकित्सा मधील त्यांचे ज्ञान मला सारख्या छोट्या गावात राहुन बाल चिकित्सा मध्ये देश आणि जागतिक पातळीवर होणारे नवनवीन संशोधनात बाबत डॉ. दिनकर राऊत अपडेट दिसत होते. देशभरात बाल चिकित्सा विषयावरील त्यांचा सहभाग, त्यांनी सादर केलेले संशोधनात्मक प्रबंध हे सगळं मुंबई, पुणे सारख्या मेट्रोपॉलिटन शहरातील राहणा-या डॉक्टरापेक्षाही अधिक अपडेट असल्याचे मला जाणवत होते. अतिशय मागास आणि छोट्या समजल्या जाणाऱ्या केज येथील डॉ. दिनकर राऊत यांच्या या रुग्णालयात ६५० प्रेम वजन रेडॉ. असलेल्या बाळास जीवनदान देणारे दिनकर राऊत हे आता पुन्हा एकदा बालचिकित्सा क्षेत्रात चर्चेत आले आहेत. केज तालुक्यातील कानाडीमाळीचे रहिवाशी असलेल्या डॉ. दिनकर राऊत यांनी वैद्यकीय शिक्षण पुर्ण करुन बाल रोग चिकित्सा या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतले. कांहीं काळ बालरोग तज्ञ या पदावर शासकीय रुग्णालयात चिचोली माळी या ठिकाणी शासकीय सेवा केली. नंतर २००५ ला फेज श योगीता बाल रुग्णालय चालू केले. केज सारख्या छोट्याशागावात अद्यायावत बाल रुग्णालय उभा करण्याचा त्यांचा धाडसी निर्णय लेंव्हा अनेकांना अचंबित करणारा वाटत होता, केज शहरापासून जवळ असलेल्या अंबाजोगाई येथे वैद्यकीय महाविद्यालय आहे. याठिकाणी बाल रोग चिकित्सा विभाग मोठा आहे. मात्र या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात जेवढ्या आवश्यक ती बंत्रसामग्री आणि वैद्यकीय सुविधा नाहीत, त्या डॉ. दिनकर राऊत यांनी आपल्या योगिता बाली रुग्णालयात उपलब्ध करून दिल्या आहेत. तख पहिल तर हे रुग्णालय बीड जिल्ह्यातील पहिले एन ए बी एच चे नामांकित बाल स्थालय आहे पुणे मुंबई प्रमाणे या रुग्णालयात अनेक प्रकारांच्या सुविधा उपलब्ध आहेत मराठवाड्यात फार मोठ्या प्रमाणात रुग्णालय आहेत त्या पैकी केज सारख्या ग्रामीण भागात केज येथील बोगिता बाल रुग्णालय हे लहान बालकांसाठी एक कदानच ठरले आहे सद्य परिस्थितीत औरगांबाद, लातूर, नांदेड या ठिकाणी सर्व सोयी युक्तर बाल रुम्मालय आहेत पण या ठिकाणी सुद्धा ६५० ग्राम च्या बाळाला जीवदान देणे शक्य झाले नाही ते योगीता बाल रुग्णालयाचे प्रमुख डॉ दिक्कर राऊत यांनी शतीचे प्रयत्न करून जहांगीर मोहा ता धारूर येथील २६ आठवहधाच्या बाळाला जीवदान दिले आहे. याबाचत सविस्तर वृत्त असे की, रिकल मुंजाराम निर्दे रा. जहांगीर मोहा ता धारूर ची एमसीएच २६ आठवडे अत्यंत अकाली जन्मलेली अत्यंत कमी ६५० ग्राम बजनाचे बाळ योगीता बाल रुग्णालयात ३ मे रोजी दाखल झाले व बाळाला एनआयसी सुमध्ये दोन महिने आकरा दिवस ठेवले गेले फार शर्तीचे प्रयत्न केले जीवदान देणे फार जोखमीचे काम होते पण डॉक्टर व सर्व टीमने प्रचंड मेहनत घेतली फार बादळी कोर्स होता सफेक्टंट, व्हेंटिलेशन, व्हॅसोएक्टिव्ह औषधे आवश्यक होती, पी मी व्ही, एफ एक पी, पण देवाच्या आशीर्वाद व डॉ दिनकर राऊत यांचे जुलै २०२३ रोजी बालिकेला सुट्टी देण्यात आली आज रिकल एकदम ठणठणीत आहे बालीकेची आई मुदतपूर्व प्रसूतीसाठी बीडला गेली होती, खीरोग तज्ज्ञाने किला चांगल्या परिणामासाठी अकाली बाळाची काळजी घेताना औरंगाबाद येथील उच्च केंद्रात जाण्यास सांगितले, परंतु पालकांनी तालुक्याच्या ठिकाणी येण्यास प्राधान्य दिले, कारण त्यांचा डॉ दिनकर राऊत आणि रुग्णालयाच्या टीमवर प्रचंड विश्वास होता. गर्भाशयात हस्तांतरण हे प्रिमेससाठी चांगले हस्तांतरण असते कमकुवत रडणाऱ्या बाळाला पिशवी आणि मास्कसह पुनरुत्थान आवश्यक आहे, नंतर सफेक्टंट, व्हेंटिलेटर सपोर्ट, इनोट्रोष प्राप्त झाले. पॉइंट ऑफ के अर फंक्शनल इकोकार्डियोग्राफीमुळे शॉक पंचो फिजियोलॉजी आणि व्हॅसोएक्टिवा औषधांचा विवेकपूर्ण बापर झालाडों दिनकर राऊत यांनी प्रतिनिधीशी बोलतांना सांगितले की, डॉ. प्रदीप सुर्यवंशी सर यांचे खूप खूप आभार ज्यांनी मला पी ओ सी यू एम शिकवले ज्यामुळे मला अस्थिर परिसरामध्ये हेमोडायनामिक्स समजून घेण्यात अधिक आत्मविश्वास मिळाला सुदैवाने बाळाला फक्त ग्रेड १ आप यही एच होते, जे चांगल्या न्यूरोलॉजिकल परिणामासाठी चांगली साथ मी आणि माझ्या एन आय यु सी टीमने शक्य ते सर्व अचूक निरीक्षण केले आणि बाळाने चांगला प्रतिसाद दिला. आनंदी समाधानी पालकांनी डिस्चार्ज झाल्यावर केवळ माझाच सत्कार केला नाही तर हॉस्पिटलच्या संपूर्ण टीमचा सत्कार केला आणि प्रत्येकाला मिठाई देऊन हॉस्पिटलमधील त्यांचे अविस्मरणीय क्षण साजरे केले, बेबीज एनआयसीयू हॉस्पिटलमध्ये ७२ दिवसांचा मुकाम ग्रेड ठरला आणि बाळाला जीवदान मिळाले आरओपी स्क्रीनिंग करण्यात आले महात्माफुले जीवनदायी योजनेत व्यवस्थापित केले. त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि समाधान उल्लेखनीय होते ज्यामुळे आम्हाला या नोबेल वैद्यकीय व्यवसायात काम करण्याची ऊर्जा मिळते. डॉक्टर साहेब खूप खूप धन्यवाद खरोखरच आपले हॉस्पिटल म्हणजे आम्हा दोधाला स्वतःच्या घरासारखे वाटले. हॉस्पिटलमध्ये स्टाफची सेवा व तुमचा सहवास हा अगदी जवळच्या नात्यासारखा वाटला. तब्बल अडीच महिने आम्ही हॉस्पिटलमध्ये राहिलो परंतु कसलाही त्रास वाटला नाही. आपण माझ्या मुलाला दिलेले जीवदानाचा प्रसंग नक्कीच आयुष्यामध्ये अविस्मरणीय असेल, मुलाने भविष्यात जर विचारले की देव कोण आहे तर नक्कीच तुमचा फोटो दाखवूर त्याला सांगेल बाळा तुझ्या आयुष्यातील देव डॉ दिनकर राऊत.



**पालक**
**मुंजाराम निरडे**

# कायद्यात मिळणार आरक्षण कोणी रोखत असेल तर तिथ मी उभी असेल-पंकजाताई मुंडे

## हात जोडतो पाया पडतो पंकजाताई यांना संसदेत पाठवा-आ सुरेश धस

वादळवार्ता/पाटोदा

कायद्यातुन - मिळणाऱ्या आरक्षणाच्या बाजूने स्व. गोपीनाथ मुंडे साहेब उभे होते. पंकजा गोपीनाथ मुंडे सुध्दा उभी आहे असे स्पष्ट करत कायद्यात मिळणारं आरक्षण कोणी रोखत असेल तर तिथे पंकजा खंबीरपणे उभी असेल सोबतच मुस्लिम समाजाच्या मनात विरोधक भीती दाखवून त्यांची दिशाभूल करत आहे दहा वर्षाच्या मोदींच्या कार्यकाळात सर्वहितावह योजनेत मुस्लिम समाजाला स्थान देण्यात आलेले आहे मुस्लिम समाजाने याचा विचार करावा असे प्रतिपादन भाजप महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी पाटोदा येथे नगर पंचायत प्रांगणात रविवार रोजी झालेल्या प्रचार सभेत केल

पुढे बोलताना पंकजाताई म्हणाल्या मी जिल्हयाची पालकमंत्री असताना शेतकरी यांना दिलासा देण्यासाठी मी शेतकर्यांना ९९२ कोटी रुपये विमा मिळवून दिला . जलयुक शिवार योजना राबविली , ग्रामीण भागात शौचालये नसल्यामुळे शौचालये बांधण्याची योजना राबविल्यामुळे महिलांची कुचंबना थांबवली . २०१४ ते २०१९ या कार्यकाळात जिल्ह्यतील ग्रामीण भागात दर्जेदार रस्ते केले . विरोधकाकडुन डॉ .बाबासाहेब . आंबेडकर यांचे संवीधान बदलविण्याच्या अफवा पसरविल्या जातात . संविधाना ला कोणीही हात घालवू शकता



नाही . तसेच या अफवाना बळी पडु नये . मला . तुम्ही संसदेत पाठवले तर मी जिल्ह्याच्या विकासाला चालना देणार आहे . जिल्ह्यातील रुर्व जाती धर्मातील रुग्णांच्या सोयीसाठी बीड येथे सुसज्ज असे हॉस्पीटल उभे करणार आहे . मी कधीही जातीपातीचे राजकारण केले नाही . त्यामुळे सर्व जाती धर्मातील मतदारांनी विरोधकांच्या अपप्रचाराला बळी न पडता मला बहुमताने मतदान करुन मला तुमची सेवा करण्याची संधी द्यावी अशी विनंती केली .

यावेळी बोलतांना आ. सुरेश आण्णा धस म्हणाले २००५ मध्ये मनरेगा योजना अंमलात आली . परंतु या योजनेला खरे रूप आले . शेतकर्यांनी विहीर , शेततळे व अन्य योजनेसाठी अर्ज केला की या योजनेचा लाभ मिळाला . शहरी भागात पंतप्रधान आवास योजना, तसेच शहरी व ग्रामीण भागात रमाई योजनेतुन गोरगरीब दलीत समाजाच्या लोकांना घरकुला चा लाभ मिळाला . पाटोदा नगर पंचायत च्या माध्यमातुन कोणताही भेदभाव न करता सर्व जाती धमीतील लोकांना भेदभाव न करता वडीलाचा व मुलाचा अर्ज आला तर त्यांना घरकुल मंजुर केले . मंगेवाडी , बांगरवाडी येथे प्रत्येक नागरीकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे . अडीच लाखाचा निधी असताना सुद्धा नागरीकानी १० लाख रु . खर्च करून दर्जेदार घरे बांधली आहे . पंकजाताई पालक मंत्री असताना जिल्ह्याच्या विकासाला गती मिळाली होती . पंकजाताई यांना मत म्हणजे नरेंद्र मोदी यांना मत बीड जिल्हयाचा विकास करण्यासाठी पंकजाताई मुंडे यांना संसदेत पाठवा असे आवाहन त्यांनी केले .

ही प्रचार सभा माजी जि .प . अध्यक्ष तथा नगरसेवक सय्यद अब्दुल्ला यांच्या अध्यक्षते खाली पार पडली . यावेळी व्यासपिठावर नगराध्यक्षा दिपाली राजेंद्र जाधव, सभापती सुवर्णा काकासाहेब लांबरुड , अजय धोंडे , अँड सुधीर घुमरे , काकासाहेब येवले , नरेंद्र जावळे, राहुल चौरे ,महेंद्र गर्जे , आप्पासाहेब राख , वाल्मीक निकाळजे , मधुकर गर्जे , सोमी नाथ कोल्हे आदीची उपस्थीती होती .

या प्रचार सभेस माजी सभापती केशव रसाळ, तात्या साहेब हुले , आनंद जाधव, नगरसेवक महादेव जाधव यांच्यासह सर्व नगरसेवक पाटोदा शहरातील नागरीक महीला मोठ्या संख्येने उपस्थीत होत्या .

उपस्थीतांचे अभार गटनेते बळीराम पोटे यांनी मारले .

# ६२२ मतदारांनी पोस्टल मतदान केले

बीड,दि. 5 : बीड लोकसभा मतदारसंघात इतर जिल्ह्यांचे मतदार जे निवडणुकीच्या कामासाठी या जिल्ह्यात कार्यरत आहेत ज्यांचे मतदान चौथ्या टप्प्यात होणार आहे. तसेच या जिल्ह्याचे पोलीस अधिकारी, कर्मचारी तथा अन्य अधिकारी कर्मचारी जे बीड लोकसभा मतदार संघातील सहा विधानसभा मतदार संघात कर्तव्यावर आहेत अशा एकूण 622 मतदारांनी आतापर्यंत पोस्टल मतदानाद्वारे मतदान केले.

निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रशिक्षणाच्या दुसऱ्या प्रशिक्षण दिवशी प्रशिक्षणाच्या ठिकाणी सुविधा केंद्र उभारण्यात आली असून या ठिकाणी पोस्टल मतदान करता येत आहे. त्यानुसार माजलगाव विधानसभा मतदारसंघात आज 11 आणि काल नऊ असे एकूण 20 पोस्टल मतदान झालेले आहेत. बीड विधानसभा मतदारसंघात 330 पोस्टल मतदान झाले आहे. आष्टी विधानसभा मतदान संघात 121 पोस्टल मतदान झाले आहे. केज विधानसभा मतदारसंघात 106 पोस्टल मतदान झाले आहे तर परळी येथील विधानसभा मतदारसंघात 45 असे एकूण 622 पोस्टल मतदान झालेली आहेत, अशी माहिती टपाली मतदान*, सहाय्यक निवडणूक अधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी कळवली आहे.



## ६, १०, ११ आणि १२ मे रोजी पोस्टल मतदान करता येणार

बीड, दि. 5 : बीड लोकसभा मतदार संघांतर्गत येणारे 230 बीड विधानसभा मतदारसंघात दि.6, दि.10, दि.11 आणि दि.12 मे रोजी पोस्टल मतदान घेण्यात येणार आहे. भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार बीड लोकसभा मतदारसंघात इतर दहा जिल्ह्यातील मतदार असलेले मतदारांना यामध्ये अधिकारी, कर्मचारी आणि पोलीस यांचा समावेश असून ते दि.6, दि.10 आणि दि.11 मे रोजी तहसील कार्यालयातील, तहसीलदार यांच्या दालनात पोस्टल मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे तेथे मतदान करू शकतात. तर दि.12 मे रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती ( एपीएमसी) येथे सुविधा केंद्र स्थापन करण्यात येणार




### पवार साहेबांचे हात बळकट करण्यासाठी मतदार बांधवांनो बजरंग बप्पा सोनवणे यांना प्रचंड बहुमताने विजयी करा:- सुरज भैय्या काटकर, अक्षय राजेंद्र शिंदे



बीड लोकसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांना तुमची पहिली पसंती देऊन तुतारी या चिन्हासमोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने निवडून द्यावे असे सुरज बळीराम काटकर आणि अक्षय राजेंद्र शिंदे यांनी तरुणांना आवाहन केले आहे. सुरज काटकर, अक्षय शिंदे हे पाटोदा तालुक्यातील गावागावात जाऊन युवा मतदारांशी संपर्क साधुन चर्चा करणार आहेत, मागील काळात बजरंग बप्पा सोनवणे यांनी केलेल्या कार्याची माहिती देणार.बीड जिल्ह्याचा विकास व सुशिक्षित बेरोजगारांना न्याय फक्त बजरंग बप्पाच देऊ शकतात. जिल्ह्याचा विकास करण्याची संधी बजरंग बाप्पांना देण्यासाठी बाप्पांच्या पाठिशी खंबीरपणे उभा रहावे,आणि बाप्पांना लाखोंच्या लीडने निवडून आणावे असे आवाहन सुरज बळीराम काटकर आणि अक्षय शिंदे यांनी केले आहे..

# पुष्पा स्टाईलने चंदन तस्करी करणाऱ्या वाहनावर केज, बीड पोलिसांचा छापा

## २ कोटी १८ लाख ३१ हजाराचा मुद्देमाल जप्त
## ६० गोण्यामध्ये १२३५.५ कि.ग्रॅम किंमतीचे चंदन जप्त

**दैनिक वादळ वार्ता/ केज**

दिनांक ०५/०५/२०२४ रोजी पहाटे ०४.३० ते ०५.१५ वाजता च्या दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेचे सहा. पोलीस निरीक्षक गणेश मुंडे यांना गुप्त बातमीदारां मार्फत माहिती मिळाली की, एक आयशर वाहन हे तोडलेल्या चंदनाच्या झाडाची वाहतुक करीत असुन ते केज कडुन धारुरकडे जाणार आहे . अशी गोपणीनय माहिती मिळाल्याने पोलीस ठाणे केज व स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे स्टाफ धारुर रोडने धारुरकडे जात असतांना नेहरकर यांचे पेट्रोलपंपासमोर एक आयशर क्रमांक एमएच.२४.एयु .९३८३ हा उभा असल्याचे आढळुन आले. सदर पथकाने सदर वाहनाच्या चालकाची चौकशी केली असता त्याने त्याचे नाव प्रियतम काशिनाथ साखरे वय ३४, रा. गुरुवारपेठ अंबाजोगाई ता अंबाजोगाई व सोबतचा इसम नामे शंकर पंढरी राख, रा. कौडगाव ता केज, जि. बीड असे नाव सांगितले. सदर वाहनाच्या चालकास विश्वासात घेवुन वाहनात काय आहे बाबत विचारले असता चालकाने वाहनात रिकामे कॅरेट असुन त्याच्यापुढे चंदनाच्या झाडाच्या गाभ्याची लाकडे असल्याचे सांगितले. चोरीच्या चंदनाची लाकडे ही बालासाहेब दत्तात्रय उर्फ बालाजी जाधव, रा. केज यांचे मालकीचे असुन त्यांचे सांगणे प्रमाणे सदरची लाकडे जालन्याकडे घेवुन जात असल्याचे सांगितले. सदर वाहनात पुढच्या साईडला चंदनाच्या झाडाचा गाभा ठेवण्यासाठी पुष्पा स्टाईल एक चोर कप्पा असुन त्यात चंदनाच्या झाडाचा गाभ्याने भरलेल्या गोण्या असुन पाठीमागील बाजुस भाजीपाल्याचे प्लॅस्टीकचे कॅरेट ठेवले होते. सदर वाहनातुन पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन साहेब यांचे समक्ष ६० चंदनाचा गाभा भरलेल्या गोण्या काढुन दिल्या. त्याचे एकुण वजन १२३५.५ कि.ग्रॅम किंमती १,९७,६८,०००असे मिळुन आले आहे. सदर कारवाईत एकुण २,१८,३१,००० किंमतीचा मुद्देमाल आशयर टैम्पोहस जप्त करण्यात आला आहे. सदर बाबत पोलीस स्टेशन केज येथे स्थानिक गुन्हे शाखेचे सहा. पोलीस निरीक्षक गणेश मुंडे यांनी दिलेल्या फिर्याद वरुन पोलीस स्टेशन केज येथे गुरनं २४४/२०२४ कलम ३७९,३४ भाविसह कलम भारतीय वन अधि. ४१,४२ कलम महाराष्ट्र वन अधिनियम २६ (फ) प्रमाणे ३ आरोपी विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर चोरीच्या चंदनाच्या झाडाचा मालक बालासाहेब दत्तात्रय उर्फ बालाजी जाधव, रा. केज याचेविरुध्द यापुर्वी बर्दापुर पोलीस स्टेशन गुरनं. ११५/२०२२ अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गुरनं १७/२०२२ गुन्हे दाखल आहेत. सदर कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक श्री नंदकुमार ठाकुर साहेब, मा. अप्पर पोलीस अधिक्षक चेतना तिडके मॅडम, सफौखेडकर, पोह/निसार शेख, पोह/तुषार गायकवाड, पोह/भागवत शेलार,




मा. सहाय्यक पोलीस अधीक्षक उपविभाग केज कमलेश मीना साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन, पोउपनि राजेश पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे सहा. पोलीस निरीक्षक गणेश मुंडे, सफौ जायभाय, पोह/कैलास ठोंबरे, पोलीस स्टेशन केज येथील पोना/दिलीप गित्ते, पोअं/मतीन शेख पोअ/शिवाजी कागदे, पोअं/संतोष गित्ते, पोअं/महादेव बहिरवाळ, पोअं/प्रकाश मुडे यांनी महत्वाची कामगिरी केलेली आहे.

# जागतिक व्यंगचित्रकार दिनानिमित्त मतदार जनजागृतीसाठी प्रदर्शन
## जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी पालीमकर यांच्या उपक्रमशीलतेला दिल्या शुभेच्छा

**बीड प्रतिनिधी**

बीड, दि.5: जागतिक व्यंगचित्रकार दिनानिमित्त बीड जिल्ह्याचे सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार सुहास पालीमकर यांनी मतदार जनजागृतीसाठी व्यंगचित्र प्रदर्शनाचे दालन उभारले. या त्यांच्या उपक्रमास जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले. सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार सुहास पालीमकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, चमन गार्डन येथील आठवडी बाजारपेठेत आज जागतिक व्यंगचित्रकार दिनानिमित्त स्वखर्चाने मतदार जनजागृतीसाठीचे व्यंगचित्र प्रदर्शन उभारले. या व्यंगचित्र प्रदर्शनीला बाजारपेठेतील नागरिकांनी भरघोस प्रतिसाद दिला. सुहास पालीमकर यांनी बीड लोकसभा मतदारसंघात मतदार जनजागृती करण्यासाठी व्यंगचित्र तयार करून दिले असून व्यंगचित्र बीड लोकसभा मतदारसंघातील मोक्याच्या ठिकाणी लावली आहेत. त्यांच्या या उपक्रमाशीलतेला जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी शुभेच्छा देऊन त्यांचे अभिनंदन केले.



# शेतीमध्ये विहिरीचे खोदकाम करीत असताना आकर्षक चकाकणारे सापडले दगड

**वादळवार्ता/सोयगाव**

परिसरातील शेतीमध्ये विहिरीचे खोदकाम करीत असताना आकर्षक चकाकणारे दगड जमिनीच्या भूगर्भात आढळून आल्याची घटना शनिवारी सायंकाळी पाच वाजता बनोटीत उघडकीस आली आहे याप्रकरणी महसूल विभागाने तातडीने रात्री विहीर सीलबंद करण्याची कारवाई केली आहे दरम्यान विहिरीच्या पोटात लाखो रु चा गौण खनिज असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे याप्रकरणी सोयगाव पोलिसांनी विहिरीजवळ संरक्षण देऊन घटनेचा पंचनामा केला असून पंचनाम्याचा अहवाल महसूल कडे पाठविला आहे

बनोटी येथील रविन्द शिवाजी शिंदे यांच्या गट क्रमांक १६९ मध्ये विहीर खोदण्याचे काम सुरू आहे. साधारण पन्नास फुटांपर्यंत विहिरीचे खोदकाम झाल्यानंतर खोदकामामध्ये पिवळसर बदामी रंग असलेले पाणीदार दगड आढळून आले; परंतु संबंधित शेतकऱ्यास हा कोणत्या प्रकारचा दगड आहे, याची माहिती नसल्यामुळे त्यांनी ही घटना नजरेआड केली; परंतु अजिंठा परिसरात काम करणाऱ्यांना याची माहिती मिळताच या विहिरीवर गर्दी वाढू लागली. मिळालेल्या चकाकणाऱ्या मौल्यवान दगडांची खरेदी करण्यासाठी गर्दी होऊ लागली. याची माहिती महसूल व सोयगाव पोलिसांकडे गेल्यानंतर उपनिरीक्षक सतीश बडे, उपनिरीक्षक रज्जाक शेख, श्रीकांत पाटील यांनी



विहीरीची पहाणी करीत मौल्यवान दगडांचा पंचनामा केला आहे रात्री उशिरापर्यंत विहिरीजवळ पोलीस बंदोबस्त तैनात होता.. सोयगाव तालुक्यात जमिनीच्या भूगर्भात रंगेबेरंगी दगडांचा खजिना आहे या शासनाच्या खजिन्याची दलालांमार्फत चोरीच्या मार्गाने विक्री केली जाते बनोटी च्या विहिरीतील गौण खनिजांचे ची विक्री झालेली असल्याची चर्चा परिसरात आहे. गौण खनिजाचा साठा ही शासनाची मालमत्ता असून, या प्रकरणी शनिवारी (दि ०४) रात्री उशीरा पोलीस प्रशासनाने विहिरीजवळ सुरक्षा पुरवून विहीरीच्या कामास प्रतिबंध केला आहे तर सोयगाव तहसील च्या वतीने सदर शेतकऱ्यांची विहीर ताब्यात घेऊन विहिरीतील मौल्यवान दगडांचा खजिना अंधारात चमकू नये यासाठी टँकर ने विहिरीत पाणी सोडण्यात आले असल्याचे तहसीलदार मनीषा मेने यांनी सांगितले अजिंठा येथील तरुण मोठ्या प्रमाणात मौल्यवान दगड, गारगोटीच्या शिल्पांची विक्री करण्याचा व्यवसाय करतात. यावर त्यांची उपजीविका सुरू आहे; मात्र विहिरीमध्ये आढळून आलेल्या चकाकणारे दगडांची चोरटी विक्री करण्याचा गोरखधंदा जर दलालांमार्फत होत असेल तर त्यास आळा घालणे आवश्यक आहे.अशी मागणी होत आहे... सदर प्रकरणी विहिरीचा शासन ताबा घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे तसा अहवाल गौण खनिज विभाग जिल्हाधिकारी कार्यालयात दिला असून विहिरीतील रंगेबेरंगी गौण खनिज सुस्थितीत आहे विहिरीतील साठा चकाकू नये म्हणून विहिरीत टँकर ने पाणी सोडण्यात आले आहे त्यामुळेरंगेबेरंगी दगड विक्रीचा विषय थांबला आहे

मनीषा मेने जोगदंड
तहसीलदार सोयगाव

बनोटी च्या विहीर प्रकरणी पोलिसांनी पंचनामा करुन महसूल ला अहवाल दिला आहे त्या विहिरीतील रंगेबेरंगी दगडांचा मौल्यवान साठा विक्री झालेली नसल्याचे प्राथमिक चौकशी वरून निष्पन्न झाले आहे पुढील कारवाई महसूल विभाग करेल महसूल ने या प्रकरणात आदेश दिल्यास पुन्हा चौकशी करू

पंकज बारवाल
पोलीस निरीक्षक सोयगाव.....

# केज युवासेना तालुका प्रमुख पदी किशोर घुले यांची निवड

**वादळवार्ता/केज**



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे आणि ,युवसेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांच्या सूचनेनुसार आणि युवासेना सचिव मा.वरूनजी सरदेसाई,शिवसेना उपनेत्या सुषमाताई अंधारे युवासेना उपसचिव ऋषिकेश खैरे,युवासेना विभागीय सचिव विनायकजी चोथे ,युवासेना विस्तारक प्रतीक जी रोचकरी, शिवसेना संपर्क प्रमुख किशोरजी पोतदार , सहसंपर्क प्रमुख बाळासाहेब जी अंबुरे , लोकसभा प्रमुख सुनील दादा धांडे , जिल्हाप्रमुख रत्नाकर अप्पा शिंदे, यूवासेना बीड जिल्हा प्रमुख रविराज बडे यांच्या सुचनेनुसार तालुका प्रमुख अशोकजी जाधव ,यांच्या मार्गदर्शनाखाली युवासेना तालुका प्रमुख पदी किशोर घुले यांची निवड करण्यात आली. निवड केल्यामुळे किशोर घुले यांनी सर्वांचे आभार मानत पक्षश्र्ष्टी ने टाकलेल्या जबाबदारीला साजेसे कांम पक्ष बांधणी साठी करून आपण टाकलेला विश्वास सार्थ ठरवेल अशी प्रतिक्रिया दिली या निवडीबद्दल पंचक्रोशीतून अभिनंदन होत आहे.

## सौ शैलजा परमणे व वंदना भंडारे यांना राष्ट्रीय साई कलारत्न समाज भूषण पुरस्कार प्रदान

कवि सरकार इंगळी शिर्डी येथील ओमसाई विकास प्रतिष्ठाण आणि बी .बी .सी . फिल्म प्रोडक्शन या संस्थेचा कवियत्री व अध्यापिका सौ शैलजा मोहन परमणे कोल्हापूर आणि वंदना भंडारे अभिनेत्री व कवियत्री इंचलकरंजी यांना . राष्ट्रीय स्तरावरील साई कलारत्न समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले पुरस्कार वितरण सोहळा सिद्ध संकल्प लॉन साकुरी शिर्डी अहमदनगर येथे मोठया दिमाखात संपन्न झाला . शैलजा परमणे यांच्या काव्य क्षेत्रातील व शैक्षणिक क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन आणि वंदना भंडारे यांची अभिनय क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांना राष्ट्रीय स्तरावरील साई कलारत्न समाजभूषण हा पुरस्कार मान्यवरांचे हस्ते देऊन सन्मानीत करण्यात आले सदर पुरस्कार वितरण सोहळा ओम साई विकास प्रतिष्ठण व बी बी सी फिल्म प्रोडक्शन या संस्थेचे प्रमुख अध्यक्ष मान . श्री सुदाम संसारे सर आणि प्रमुख सिनेसृष्टीतील कलाकार व त्यांचे संस्थेचे पदाधिकारी यांचे हस्ते प्रदान करण्यात आला . त्यांना साईकला रत्न समाजभूषण पुरस्कार मिळालेने विविध स्तरातून कौतुक होत आहे .

# माजलगावात बजरंगबप्पा यांच्या विजयासाठी शेख मंजुर डोअर टु डोअर. बजरंगबप्पा सोनवणे यांना मतदान करण्याचे केले आवाहन.

माजलगाव प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार बजरंगबप्पा सोनवणे मैदानात उतरले आहेत.त्यांच्या विजयासाठी माजी नगराध्यक्ष शेख मंजूर यांनी माजलगाव शहरातील चौकाचौकात,डोअर टु डोअर प्रचार करून बजरंगबप्पा सोनवणे यांना प्रचंड मताधिक्यानी विजयी करा असे आवाहन त्यांनी केले आहे. लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. माजलगाव शहरात ही माजी नगराध्यक्ष शेख मंजुर यांनी बजरंगबप्पा सोनवणे यांच्यासाठी प्रचारात आघाडी उघडली आहे. शहरात चांदणी ग्राउंड,बरकत नगर फुलेनगर गोडाऊन,आयशा नगर, कुरेशी मोहल्ला,फुले नगर,दावल मलिक,अरफान मोहल्ला,इंदिरा नगर,अशोक नगर,यासह रस्त्यावर शहरातील चौका चौकात, वेगवेगळ्या भागात डोअर टु डोअर प्रचार फेरी काढून मतदारांच्या भेटी घेत आहेत.यावेळी मतदारांना ते तुतारी फुंकणारा माणूस या चिन्हा समोरील बटन दाबून बजरंगबप्पा ना विक्रमी मतांनी मतदान करण्याचे आवाहन करत आहेत. यावेळी मतदारांमधून त्यांच्या आव्हानाला चांगला प्रतिसाद मिळत होता. बजरंगबप्पा सोनवणे यांचे पारडे जड होत असल्याचे दिसत आहे. दरम्यान त्यांच्यासोबत शहराध्यक्ष शकील भाई कुरेशी, मौलाना इद्रिस हाफेज मोहसीन, नुमान चाऊस इमरान खान,शाकेर कुरेशी,निसार मामु,फेरोज कुरेशी, मजहर शेख,रईस शेख मुज्जुभाई, अब्दुल समद,अमजद पठाण यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



# वंचित बहुजन आघाडी च्या आयडियल प्रचारने महा युती, महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी घेतली धास्ती

## अशोक हिंगे यांना गावागावातून मिळतोय मोठा प्रतिसाद

वादळवार्ता/बीड

बीड लोकसभे च्या प्रचाराचा दुसरा टप्पा संपत आला असून बीड जिल्ह्यात महायुती, महाविकास आघाडी आणि वंचित बहुजन आघाडी अशी तिरंगी लढत दिसून येत आहे मात्र उमेदवार अशोकराव हिंगे पाटील यांच्या आयडियल प्रचाराने विजयाकडे वाटचाल चालू केली आहे गावोगावी,तांडा वस्तीवर वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोकराव हिंगे पाटील यांचे जोरदार स्वागत करून वंचित बहुजन आघाडीलाच निवडून देणार असल्या ची हमी मतदार देत आहेत यामुळे महायुती, महाविकास आघाडी च्या उमेदवारानी धास्ती घेतली आहे तर त्यांचा प्रचार फीका पडला आहे

सध्या बीड लोकसभेच्या प्रचाराची रणधुमाळी जोरात चालू असून सर्वच पक्षांची प्रचारासाठी धावाधाव चालू आहे महायुती महाविकास आघाडी च्या दोन्ही उमेदवारांनी निवडणुकीला जातीचा रंग दिला आहे मात्र पुरोगामी महाराष्ट्रात जातिवादाला थारा मिळणार नाही इथे विकासावर निवडणुका होतात ही बाब लक्षात घेऊन वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांनी आयडियल प्रचार चालू केला आहे प्रत्येक गावात जाऊन तेथील मूलभूत सुविधा सोडवण्याची हमी देत आहेत, तरुणांच्या हाताला काम, शेतकऱ्याच्या मालाला मुबलक दाम मिळवून देण्यासाठी मला संसदेत पाठवा असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील करत आहेत त्यांच्या या आव्हानाला बीड जिल्ह्यातील सुज्ञ मतदाराकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे यामुळे महायुती महाविकास आघाडी च्या उमेदवारच्या पायाखालील वाळू सरकू लागली आहे महायुती, महाविकास आघाडीचा प्रचार अडगळीला पडत असल्याने वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटील यांचा विजय निश्चित आहे महाराष्ट्र मधून दिन दलित गोरगरीब मराठा, मुस्लिम, साळी माळी कोळी, हटकर, धनगर, वंजारी, बंजारा, चांभार कुंभार आदी घटकांसाठी काम करणारा पक्ष म्हणजेच वंचित बहुजन आघाडी हे महाराष्ट्रातील सुज्ञ मतदारांच्या लक्षात आले आहे त्यामुळे १३ मे रोजी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे पाटीलयांच्या वर मतदान रुपी पडेल गॅस सिलेंडर चिन्हा समोरील बटन दाबून वंचितांचा आवाज लोकसभेत गेल्याशिवाय राहणार नाही असे चित्र आहे देशाला महागाईचा काहीतरी लोटणाऱ्या भारतीय जनता पार्टीला नरेंद्र भाई मोदी यांना सत्तेपासून दूर ठेवण्याची गरज असल्याचेही अशोक हिंगे पाटील यांनी सांगितले प्रकाश



आंबेडकरांचे हात बळकट करण्यासाठी घटनेचा संरक्षण करण्यासाठी वंचित बहुजन विकास आघाडी संसदेत जाणे खूप गरजेचे आहे अशोक पाटील यांनी सांगितले म्हणून गॅस सिलेंडर समोरील बटन दाबून प्रचंड मताधिक्यानी विजयी करावे आसे आवाहन अशोक हिंगे पाटील यांच्या वतीने करण्यात येत आहे. त्या मध्ये शहराध्यक्ष लखन जोगदंड,अक्षय गायकवाड, अर्जुन गायकवाड, रोहित गायकवाड, सुजल गायकवाड, विजय गायकवाड, प्रकाश गायकवाड, अनिल वाघमारे, सुनील वाघमारे, मंगेश वाघमारे, शंतनू वाघमारे, ओमकार केदार, अभिमान केदार, अक्षय केदार, विनोद वडमारे, महेश सोनवणे, शुभम जाधव,राहुल जाधव, अक्षय जाधव, राहुल अड्डागळे, अनिल थोरात, जितेंद्र केदार, गौतम शिंदे, सचिन केदार, गणेश भांगे, रोहित कसबे, महेश वाघमारे, अनिल शिरसागर, अविनाश अडगळे, अंबादास गायकवाड, अभिजीत खांडेकर, गणेश ठोकळ,आदी सहभागी होते.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )